**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे**
**सर्व्हे नं ८३२ ए,फायनल प्लॉट नं १७८व१७९,भांबुर्डा शिवाजीनगर, पुणे ४११००४**
**फो.नं,०२०२५७०५०००** **फॅक्स नं ०२०२५६६५८०७**

# परिपत्रक

**क्र.रा. म./संशोधन/ विशेश गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विषय योजना/ मूल्यमापन योजना/४९१६, दिनांक-२७/०९/२०१९**

**विषयः- माध्यमिक स्तरावरील इ.९वी व १० वी च्या अंध व स्वमग्न दिव्यांग असणाऱ्या विद्यार्थ्यांना भाषा विषयामध्ये सवलत देण्याबाबत**

संदर्भः- १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. रा.म./संशोधन/ वि.ग.अ.(दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या विषय योजना/मूल्यमापन योजना/३२९०, दिनांक २२/०६/२०१८.
२. जा.क्र.मराशैसंप्रप/अविवि/इ.१०वी विषयायोजना व मूल्यमापन/२०१८-१९/२७३३/ दिनांक-१४/०६/२०१८ चे पत्र.
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. रा.म./संशोधन/ वि.ग.अ.(दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या विषय योजना/मूल्यमापन योजना/५१११, दिनांक २८/०९/२०१८.
४. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/(११८/१७)/एसडी-६, दि.१६/१०/२०१८
५. शासनाचे क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.८२/एसडी-६, दि.२१/०८/२०१९ चे पत्र.

या परिपत्रकाव्दारे महाराष्ट्रातील सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळाप्रमुखांना/मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, इयत्ता ९ वी व १० वी साठी विशेष गरजा असलेल्या दृष्टीबाधित, अध्ययन अक्षम, कर्णबधिर, बहुविकलांग(स्पॅस्टिक), ऑटिस्टिक (स्वमग्न) सेरेबल पाल्सी, मतिमंद, गतिमंद, इत्यादि दिव्यांग विद्यार्थ्यासाठी मंडळाने विषय योजना व मुल्यमापन योजना, अभ्यासक्रम तयार केले आहेत. याबाबतची माहिती मंडळाने वेळोवेळी परिपत्रकाव्दारे संबधितांस कळविलेली आहे. विशेष गरजा असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध सोयीसवलती मंडळाने यापुर्वीच वेळोवेळी उपलब्ध करून देवून त्या उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाव्दारे कळविलेल्या आहेत. त्याप्रमाणे सध्या कार्यवाही सुरू आहे. हे आपणांस विदीत आहेच.

मंडळाने इ.९ वी व १० वी च्या मतिमंद/गतिमंद/कर्णबधिर इ. दिव्यांग विदयार्थ्यांना राज्य मंडळाने निश्चित केलेली विषय/ परीक्षा योजना अंध व स्वमग्न (Autism) विदयार्थ्यांनाही सदर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेउन सवलत लागू करण्यात येत आहे.

तरी अंध व स्वमग्न (Autism) विद्यार्थ्यांना दयावयाची विषय योजना/मूल्यमापन योजनेचे तक्ते सोबत जोडले आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. याशिवाय शासन निर्णय दिनांक ८ **ऑगस्ट, २०१९ व राज्यमंडळ परिपत्रक दिनांक १६ ऑगस्ट, २०१९ नुसार इ.९वी व इ.१०वी च्या संबंधित विषयांच्या मूल्यमापन धोरणात (लेखी व अंतर्गत मूल्यमापनाबाबत-तोंडी, प्रात्यक्षिक,व इतर) झालेले बदल संबंधित विषयांना लागू राहतील.**

**आदेशान्वये,**

सचिव,
राज्यमंडळ, पुणे.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/ 1950
कोल्हापूर ४१६००४.
दिनांकः-०१/१०/२०१९

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

**राज्य मंडळाचे जा.क्र. रा.मं./संशोधन/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विषय योजना/मूल्यमापन योजना /४९१६ दि.२७/०९/२०१९** रोजीच्या परिपत्रकान्वये कळविल्याप्रमाणे माध्यमिक स्तरावरील इ.९ वी व इ.१० वी च्या **अंध व स्वमग्न दिव्यांग असणाऱ्या** विद्यार्थ्यांना **भाषा विषयामध्ये सवलत देण्याबाबत** उक्त नमूद परिपत्रकाद्वारे कळविले असून सोबत विषय योजना व मूल्यमापन योजना यांचे तक्ते जोडले आहेत. तरी या विभागीय मंडळाच्या अखत्यारीतील सर्व शाळाप्रमुखांनी सदर परिपत्रकाची नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रति,
विभागीय सचिव,
पुणे,नागपूर,औरंगाबाद,मुंबई,कोल्हापूर,अमरावती,नाशिक,लातूर,कोकण,विभागीय मंडळे,
पुणे,नागपूर,औरंगाबाद,मुंबई,कोल्हापूर,अमरावती,नाशिक,लातूर,कोकण,

यांना कळविण्यात येते, उपरोक्त परिपत्रक आपल्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/विद्यालय प्रमुखांना त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

* प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:

१. मा.आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१.
२. मा.सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.
४. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती,पुणे-०४
५. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्याप्राधिकरण), पुणे-३०.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग,
७. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद.
८. शाखा-परीक्षा-पापुअ-पापुई, ऑनलाईन, ग्रंथालय, मा.अध्यक्षाचे अस्विस , मा. सचिवांचे अस्विस

# (१) दृष्टीबाधित (Visual Impaired) विद्यार्थ्यांसाठी विषय परीक्षा योजना

इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विषय परीक्षा योजना

| अ. क्र. | विषयाचे नाव | लेखी + प्रात्यक्षिक/ अंतर्गत मूल्यमापन | एकूण गुण |
|---|---|---|---|
| ०१ | *प्रथम भाषा<br>(प्रथम भाषा/व्दितीय भाषा/ तृतीय भाषा या शिर्षकाखालील कोणतीही एक भाषा) | १०० | १०० |
| ०२ | * व्दितीय भाषा (संपूर्ण अभ्यासक्रम)<br>किंवा<br>* संयुक्त अभ्यासक्रम<br>(व्दितीय भाषा/ तृतीय भाषा या शिर्षकाखालील कोणतीही एक भाषा)<br>किंवा<br>कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या विषयांपैकी कोणताही एक विषय<br>लेखी+ वार्षिक काम + प्रात्यक्षिक<br>२५ + २५ + ५० = १०० गुण | १००<br>किंवा<br>(५०+५०=१००) | १०० |
| ०३ | * तृतीय भाषा<br>(व्दितीय भाषा/ तृतीय भाषा या शिर्षकाखालील कोणतीही एक भाषा)<br>किंवा<br>कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या विषयांपैकी कोणताही एक विषय<br>लेखी+ वार्षिक काम + प्रात्यक्षिक<br>२५ + २५ + ५० = १०० गुण | १०० | १०० |
| ०४ | गणित,( बीजगणित, भूमिती)<br>अंतिम लेखी परीक्षा<br>गणित भाग १(बीजगणित) -- ४० गुण<br>गणित भाग २(भुमिती) -- ४० गुण<br>अंतर्गत मुल्यमापन<br>गणित भाग १ प्रात्याक्षिक -- ५ गुण<br>गणित भाग २ प्रात्याक्षिक --५ गुण<br>गणित भाग १ ची चाचणी परीक्षा --५ गुण<br>गणित भाग २ ची चाचणी परीक्षा --५ गुण<br>(वरील चार मिळून) २० गुण<br>एकूण = १००गुण | ४०+४०+२०<br>=१०० | १०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | किंवा<br>* विशेष गरजा असलेल्या मुलांसाठीचे अंकगणित (इ. ७ वी चे)<br>आणि<br>* कार्यशिक्षण विषयांपैकी कोणताही एक विषय (भाषेऐवजी घेण्यात आलेल्या कार्यशिक्षणाच्या विषयांव्यतिरिक्त )<br>लेखी + वार्षिक काम + प्रात्याक्षिक<br>२५ + २५ + ५० = १०० गुण<br>(कार्यशिक्षण विषयाचे १०० गुणाचे रुपांतर ५० गुणांमध्ये करण्यात येईल.) | ५० आणि ५० } १०० | १०० |
| ०५ | * विज्ञान आणि तंत्रज्ञान<br>लेखी परीक्षा<br>पेपर १ --- ४० गुण<br>पेपर २---- ४० गुण<br>प्रात्याक्षिक परीक्षा व उपक्रम-- २० गुण<br>प्रयोग -१२ गुण (पेपर १ = ६ गुण + पेपर २ = ६ गुण)<br>नोदंवही -४ गुण (पेपर १ = २ गुण + पेपर २ =२ गुण)<br>उपक्रम नोदंणी- ४ गुण (पेपर १ = २ गुण +पेपर २ = २ गुण)<br>किंवा<br>*शरीरशास्त्र,आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र - लेखी परीक्षा<br>प्रात्याक्षिक परीक्षा<br>वार्षिक काम (जर्नल) | ४० ४० २० } १००<br>किंवा<br>६० २० २० } १०० | १००<br><br>१०० |
| ०६ | सामाजिक शास्त्रे<br>१.इतिहास व राज्यशास्त्र ४० +२० =६०<br>२.भूगोल ४० | ४०+२०=६०<br>४० | १०० |

* टीप –

१) इ.१०वी नंतर पुढील अभ्यासक्रमास जावयाचे असल्यास इंग्रजी भाषा विषय घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी प्रथमभाषा, व्दितीय भाषा, तृतीय भाषा या शिर्षकाखाली घेतलेला प्रत्येक भाषा, विषय स्वतंत्र असणे आवश्यक आहे. एकच भाषा विषय २ वेळा घेता येणार नाही.तसेच कार्यशिक्षणाचाही एकच विषय २ वेळा घेता येणार नाही. तसेच श्रेणी विषयांमध्येही **(Grade Subject)** तोच विषय पुन्हा घेता येणार नाही.

२) अमराठी माध्यमाच्या शाळातील विद्यार्थ्यांना मराठी भाषा विषय न घेण्याची सवलत अनुज्ञेय राहील.

--- *** ---

## (२) स्वमग्न (Autistic) विद्यार्थ्यांसाठी विषय परीक्षा योजना

इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विषय परीक्षा योजना

| अ. क्र. | विषयाचे नाव | लेखी प्रात्यक्षिक/ अंतर्गत मूल्यमापन | एकूण गुण |
|---|---|---|---|
| 0१ | *प्रथम भाषा<br>(प्रथम भाषा/व्दितीय भाषा/तृतीय भाषा या शिर्षकाखालील कोणतीही एक भाषा) | १०० | १०० |
| 0२ | * व्दितीय भाषा (संपूर्ण) किंवा (संयुक्त)<br>(व्दितीय/तृतीय भाषा या शिर्षकाखालील कोणतीही एक भाषा)<br>किंवा<br>* कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या विषयांपैकी कोणताही एक विषय<br>लेखी + वार्षिक काम + प्रात्याक्षिक<br>२५ + २५ + ५० = १०० गुण | १००<br>किंवा<br>१०० | १०० |
| 0३ | * तृतीय भाषा<br>(व्दितीय भाषा/तृतीय भाषा या शिर्षकाखालील कोणतीही एकभाषा)<br>किंवा<br>*कार्यशिक्षण विषयांतर्गत येणाऱ्या विषयांपैकी कोणताही एक विषय<br>लेखी + वार्षिक काम + प्रात्याक्षिक<br>२५ + २५ + ५० = १०० गुण | १००<br>किंवा<br>१०० | १०० |
| 0४ | गणित,( बीजगणित, भूमिती)<br>अंतिम लेखी परीक्षा<br>गणित भाग १(बीजगणित) -- ४० गुण<br>गणित भाग २(भुमिती) -- ४० गुण<br>अंतर्गत मुल्यमापन<br>गणित भाग १ प्रात्याक्षिक -- ५ गुण<br>गणित भाग २ प्रात्याक्षिक --५ गुण<br>गणित भाग १ ची चाचणी परीक्षा --५ गुण<br>गणित भाग २ ची चाचणी परीक्षा --५ गुण } २० गुण<br>एकूण = १००गुण | ४०+४०+२०<br>=१०० | १०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | किंवा<br>* विशेष गरजा असलेल्या मुलांसाठीचे अंकगणित (इ. ७ वी चे)<br>आणि<br>* कार्यशिक्षण विषयांपैकी कोणताही एक विषय<br>(भाषेऐवजी घेण्यात आलेल्या कार्यशिक्षणाच्या विषयांव्यतिरिक्त )<br>लेखी + वार्षिक काम + प्रात्याक्षिक<br>२५ + २५ + ५० = १०० गुण<br>(कार्यशिक्षण विषयाचे १०० गुणाचे रुपांतर ५० गुणांमध्ये करण्यात यईल.) | ५०<br>५० | १०० |
| ०५ | * विज्ञान आणि तंत्रज्ञान<br>लेखी परीक्षा<br>पेपर १ --- ४० गुण<br>पेपर २---- ४० गुण<br>प्रात्याक्षिक परीक्षा व उपक्रम-- २० गुण<br>प्रयोग -१२ गुण (पेपर १ = ६ गुण + पेपर २ = ६ गुण)<br>नोदंवही -४ गुण (पेपर १ = २ गुण + पेपर २ =२ गुण)<br>उपक्रम नोदंणी- ४ गुण (पेपर १ = २ गुण +पेपर २ = २ गुण)<br>किंवा<br>*शरीरशास्त्र,आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र लेखी परीक्षा -<br>प्रात्याक्षिक परीक्षा -<br>वार्षिक काम (जर्नल)- | ४०<br>४० } १००<br>२०<br>किंवा<br>६०<br>२० } १००<br>२० | १००<br>१०० |
| ०६ | सामाजिक शास्त्रे<br>१.इतिहास व राज्यशास्त्र ४० +२० =६०<br>२.भूगोल ४० | ४०+२०=६०<br>४० | १०० |

* टीप -

१) इ.१०वी नंतर पुढील अभ्यासक्रमास जावयाचे असल्यास इंग्रजी भाषा विषय घेणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी प्रथमभाषा,व्दितीय भाषा,तृतीय भाषा या शिर्षकाखाली घेतलेला प्रत्येक भाषा, विषय स्वतंत्र असणे आवश्यक आहे..एकच भाषा विषय २ वेळा घेता येणार नाही.तसेच कार्यशिक्षणाचाही एकच विषय २ वेळा घेता येणार नाही. तसेच श्रेणी विषयांमध्येही (Grade Subject) तोच विषय पुन्हा घेता येणार नाही.

२) अमराठी माध्यमाच्या शाळातील विद्यार्थ्यांना मराठी भाषा विषय न घेण्याची सवलत अनुज्ञेय राहील.

--- *** ---